प्रेसनोट

जावक क्रमांक :-२५००/२०१८
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर
दिनांक :- २०/०६/२०१८

प्रति,

मा. व्यवस्थापक
दैनिक पुणे

**विषय :-** मयताचा व त्याचे वारसाचा तपास होणेकरीता आपले दैनिकामध्ये प्रसिध्दी देणेबाबत.

कोंढवा पो.स्टे. गुन्हा रजि. नं. ३५०/२०१८ भा. दं. वि. क. ३०२, २०१ यातील फिर्यादी बसवराज शिवराज उजणे पोलीस नाईक ब.नं. ६८५६ नेमणुक कोंढवा पो.स्टे.पुणे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्यात मजकुर की, दिनांक १९/०६/२०१८ रोजी १६/४५ वा. चे पुर्वी एका अनोळखी इसमास कोणीतरी अज्ञात इसमांनी कोणत्यातरी अज्ञात कारणांकरीता तिक्ष्ण हत्याराने त्याच्या पोटावर व हातावर वार करुन त्यास जीवे ठार मारुन सर्व्हे नं. २९ कोंढवा बुद्रुक पुणे येथील निकुंज संघवी व रिकी राजपाल बिल्डर यांच्या मोकळ्या प्लॉटवर कंपाऊंड लगतच्या खड्ड्यात त्याचे धड टाकून त्याची ओळख पटवु नये म्हणुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याच्या अंगावरील कपडे काढून त्याचे शिर कापुन धडापासून अलग करुन कोठेतरी विल्हेवाट लावलेली आहे. वगैरे मजकुराची फिर्याद दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यातील अनोळखी मयत पुरुषाचे चे वर्णन खालील प्रमाणे,

१) सदर अनोळखी पुरुषाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे,
२) मयताचे डाव्या पोटरीवर काळा दोरा बांधलेला आहे.
३) डाव्या हाताच्या नखाला लाल रंगाचे नेल पॉलिश आहे.
४) मयताचे अंगावर माचो कंपनीची चॉकलेटी रंगाची अंडरवियर आहे.
५) घटनास्थळाजवळ मिळून आलेले एक काळ्या रंगाचे टी-शर्टचे असुन टी-शर्टवर डाव्या बाजुस ROCK 1987 JEANS असे इंग्रजीत छापलेले.
६) एक निळ्या रंगाचा हाफ बाह्याचे टी-शर्टचे मागील बाजुस SK PHALTAN असे लिहीलेले व सदर टी-शर्टच्या डाव्या बाजुस "रामराजे निंबाळकर २०१७ श्री"असे लिहीलेले असुन सदर टी-शर्ट सोबत त्याचा एक निळ्या व पांढऱ्या रंगाचा लहान तुकडा दिसत असुन त्यावर बॉडी बिल्डरचे चित्र आहे. एक लाल रंगाचे फाटलेले सॅन्डो बनियन, सदरचे बनियनचे आतील बाजुस कॉलरचे पट्टीवर खाली sporto असे इंग्रजीत लिहीलेले.

तरी दाखल गुन्हयातील मयताचे अंगावरील कपड्यांचे फोटो सोबत जोडलेले असुन मयताचा व त्याचे वारसांचा तपास होणेकरीता तसेच मयताचे नातेवाईकांबाबत काही माहीती असल्यास संपर्क क्रमांक कोंढवा पो.स्टे.- ०२०-२६९३०७८०, वपोनि श्री गायकवाड- ८१०८३६९२९२ व पो.उप.नि. श्री शिंदे ९९२२९५५४७० यावर संपर्क साधणेकरीता आपले वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देणेस विनंती आहे.